श्री शंकरस्वामी बहुउद्देशीय विश्वस्त मंडळ संचलित, शिऊर

# जे. के. जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वैजापूर जि. औरंगाबाद.

एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

# "भारतीय समाज : प्रश्न, समस्या आणि परिवर्तन"

(आंतरविद्याशाखीय)

२७ फेब्रुवारी २०१७

मुख्य संपादक

प्राचार्य डॉ. भीमराव वाघचौरे

उपप्राचार्य प्रा. सुनिल के. कोलकर

संपादक मंडळ

डॉ. दिलीपकुमार डी. साळवे

प्रा. विकास आर. झाकडे

प्रा. विष्णू पी. भिंगारदेव

## मराठी भाग - १





अजिंठा प्रकाशन

178

# अनुक्रमणिका मराठी भाग - १



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | अस्तित्वावादी मराठी कादंबरीचा आरंभबिंदू : 'कोसला'<br>डॉ. सुषमा एस. प्रधान | ४९-५१ |
| १५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार कल्याणातील योगदान<br>सुनिल दाभाडे | ५२-५४ |
| १६ | दहशतवाद - एक जागतिक समस्या<br>शेळके संजय दत्तराम<br>कोकाटे अश्विनी बालाजीराव<br>पाटील अनुराधा गणपतराव | ५५-५९ |
| १७ | मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून ताण आणि तणाचे व्यवस्थापन : एक अभ्यास<br>धाबे संजय किसन<br>इंगोले मुरलीधर कुंडलिक | ६०-६३ |
| १८ | शेतकऱ्यांच्या आत्महत्या: एक सामाजिक समस्या<br>राऊत रेखा ज्ञानोबाराव | ६४-६५ |
| १९ | स्त्री घरकामगार (मोलकरीण) : एक अभ्यास<br>श्रीमती जाधव रेखा शिवाजीराव | ६६-६९ |
| २० | भारतीय स्त्रियांचा दर्जा<br>प्रा. डॉ. राम रौनेकर | ७०-७२ |
| २१ | कुपोषणांच्या गुलामगिरीत होणारी वाढ - एक गंभीर समस्या<br>राजू पुरभाजी खिल्लारे | ७३-७७ |
| २२ | सण उत्सव : आहार, आरोग्य व पर्यावरण - दृष्टीक्षेप<br>प्रा. प्रतिभा विष्णु आघाडे | ७८-८२ |
| २३ | भारतीय स्त्रियांचा दर्जा - राजकीय सत्ता सहभागासंबंधी<br>प्रा. प्रतिभा दावरी | ८३-८७ |
| २४ | पायाभूत सुविधांचा आभाव व शेतकरी आत्महत्या<br>पाटील स्वाती विजय | ८८-९३ |
| २५ | संस्कारातून संस्कृतीसंवर्धन<br>प्रा. पंकजा अहिरे | ९४-९६ |

२०

# भारतीय स्त्रियांचा दर्जा

प्रा. डॉ. राम रौनेकर

मराठी विभाग प्रमुख, पदवी-पदव्युत्तर व संशोधन विभाग, मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड, जि. जालना.

भारतीय तत्त्वधारा 'अर्धनारीनटेश्वर' ही संकल्पना स्वीकारते. या संकल्पनेत केवळ स्त्री - पुरूष समानता अपेक्षित नाही ; तर सहचर भावाबरोबरच ‘अव्दैत’ भावाचे दर्शन घडते. अध्यात्मिक पातळीवर भारतीय स्त्री - पुरूषांचे ऐक्य अधोरेखित होते. मात्र सामाजिक तथा व्यावहारिक पातळीवर हे ऐक्य अपवादाने आढळते. तत्त्व आणि व्यवहार यात भारतीयांनी अनेकदा भेद केला आहे. याची साक्ष आपल्याकडील पुराणे, श्रुती - स्मृती देत आहेत. काळाबरोबर मान - सन्मानाची, इच्छा - आकांक्षाची परिमाणे बदलत गेली आहेत. परकीय आक्रमकांनी या देशावर वारंवार आक्रमणे केली. आक्रमणे करणारे बहुसंख्ये पुरूष असत. त्यांच्या कुदृष्टीस आपल्या स्त्रिया पडू नयेत. त्यांच्या स्वैराचारी - दुराचारी वर्तनुकीमुळे शीलसंवर्धनार्थ भारतीयांना स्त्रीचे स्वातंत्र्य मर्यादित करावे लागले. तिचे धार्मिक - अध्यात्मिक, सामाजिक - सांस्कृतिक, कौटुंबिक व आर्थिक अधिकार मर्यादित करण्यात आले. डॉ.श्रीमती एस.के. स्वामी म्हणतात, "पुढे मुस्लिम आक्रमणानंतर स्त्रियांची स्थिती खूपच खालावली."

मध्ययुग ते एकोणीसाव्या शतकापर्यंत स्त्री अधिक बंदिस्त झाली. या काळात स्त्रियांची मोठ्या प्रमाणावर कुचंबणा झाली. उपेक्षित जीवन त्यांच्या वाट्यास आले. इतके की त्या पडद्याआड गेल्या. 'शेंधा वाढा - उष्टी काढा' एवढेच त्यांचे जीवनक्षेत्र मर्यादित करण्यात आले. इतके की, स्त्रियांना स्त्री जन्म नको. असे वाटू लागले. संत साहित्याच्या अभ्यासनातून हे ध्यानी येते. संत जनाबाई स्वत:ला आणि समाजाला समजावताना ‘स्त्रीजन्म म्हणुनि न व्हावे उदास’ असे म्हणतात. येथे त्यांच्या मनातील सल लपत नाही. या जन्मात आपण आपले स्वतंत्र स्थान निर्माण करू शकतो. असा आशावादी दृष्टिकोन त्या ठेवतात. वारकरी संप्रदायात स्त्रियांना मानाचे स्थान आहे. तसेच स्थान महानुभावांनीही दिले आहे. म.बसवेश्वरांनी तर 'अनुभवमंटप' या व्यासपीठावरून स्त्रियांना सन्मानाबरोबरच आरक्षण दिले आहे.

भारतीय स्त्रियांच्या समस्यांबद्दल पोटतिडकीने लेखन करणारा एक वर्ग हळूहळू उदयाला आला. त्यांनी भारतीय रूढी आणि अनिष्ट परंपरांना छेद देत देत आधुनिक समतावादी विचारधारा प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न केला. पोथ्या - पुराणातील कालबाह्य विचारांची टर उडवित - उडवित नव्या विचारांची पेरणी केली. यातून समाज अंतर्मुख होत गेला. अभिधा - लक्षणा - व्यंजना हे शब्दांचे त्रिविध संबंध न कळाल्यामुळे अनेकदा भारतीय तत्त्वज्ञानातील उदात्त संकल्पनांची व्यवहारात कशी फारकत होते. याचेही दर्शन या लोकांनी घडविले.

“अहल्या, द्रौपदी, सीता | तारा, मंदोदरी तथा |

पंचकन्यास्मरे नित्यंम् | महापातक नाशनम् ||”

या श्लोकामध्ये सांगितले आहे की, वरील पाच कन्यांची केवळ नामे उच्चारली ; तर आपली महापातके नाश पावतात. स्त्रीयांकडे पाहण्याचा आपल्या पूर्वजांचा दृष्टिकोन यातून प्रकट होतो. संत तुकाराम महाराज पतिव्रतेचे वर्णन ‘तुका म्हणे पतिव्रता | तिची देवावर सत्ता’ असे करतात.

साधुसंतांनी स्त्रियांना मानाचे स्थान दिले असले ; तरी समाजाने त्यांचे म्हणावे तसे स्वागत केले नाही. म्हणून प्रतिभा रानडे म्हणतात, ‘मुलाच्या जन्माचे जसे स्वागत होई, तसे स्वागत मुलीच्या वाट्याला येत नसे’ ही वेदना घेऊन स्त्रीया मार्गक्रमण करीत राहिल्या.

पुढे इंग्रजांचा संपूर्ण देशावर अंमल सुरू झाला. त्यांच्या स्त्री - पुरूष समतावादी विचार संक्रमणातून भारतीयांची एक सुशिक्षित पिढी पुढे आली. या पिढीने स्त्रीला सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक, शैक्षणिक व धार्मिक समताधिष्ठित न्याय देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. ज्यामुळे स्त्रियांचे जीवन उजाळून निघाले. महात्मा जोतीबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्री.विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे यांसारख्या परिवर्तनवादी विचारवंतानी व आचारवंतांनी ‘स्त्री - शक्ती’ समाजाला समजावली. त्यामुळे ‘शक्ती - स्त्री’ समाजास समजली. या सबल - संवर्धन भविष्यगामी

जीवनमानमूल्यांमुळे ही स्त्री - नव्या युगाची युगंधरा मीड असे आत्मनिर्भरतेने व आत्मविश्वासाने म्हणू लागली. डॉ.अश्विनी धोंगडे म्हणतात, च्स्त्रियांच्या परंपरागत भूमिकेला चिकटून राहणाऱ्या सनातन्यांबरोबर जुन्या पोथ्यापुराणातून स्त्रियांच्या दुय्यमपणाचे दाखले देणाऱ्या पोथीनिष्ठ धर्मगुरूविरूध्दही स्त्रियांना लढावे लागले.छ३ विस्कळीत

झालेल्या सामाजिक परिस्थितीला सुधारावे लागले. स्वतःची किंमत स्वकर्तृत्वाने सिध्द करावी लागली. पोथ्या - पुराणांचा आधार घेऊन स्वातंत्र्य नाकारणाऱ्या भोंदू साधूंचा बुरखा फाडावा लागला. व्यावहारिक जीवनात स्त्रियांचे स्थान किती अनन्यसाधारण आहे. हे सप्रमाण समाजाला समजून सांगावे लागले. परिणामी समाजाच्या मनोवृत्तीत हळूहळू बदल होऊ लागले. डॉ.दु.का.संत म्हणतात, चब्रिटिशांचे या देशात प्रस्थापित झालेले राज्य अनेक दृष्टींनी वेगळे होते, ही गोष्ट ते राज्य सर्वदूर रूढ झाल्यावर ज्या नव्या नव्या सुधारणा ब्रिटिशांनी येथे सुरू केल्या त्या लक्षात घेतल्या असता स्पष्ट होते. ह्या सुधारणांनी जीवनात इतकी आमूलाग्र क्रांती घडवून आणली की, नवा दृष्टिकोन निर्माण झालाछ४ यात भारतीय स्त्रीया मागे राहतील तरच नवल !

जगाला दया, क्षमा आणि शांतीङ्चा संदेश देणाऱ्या भारतीय स्त्रियांनी भूतकाळाकडून उज्ज्वल ते स्वीकारले. स्वतःतील कीर्ती, श्री, वाणी, स्मृती, मेधा, धृती आणि क्षमा या सात शक्ती ओळखून शिक्षणास जवळ केले. परिणामी त्यांच्या बुध्दिचा व व्यक्तिमत्वाचा विकास झाला. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांचा बेमालूम संचार चालू झाला. जीवनदायी शल्यचिकित्सिका, डोळस अभियंती, रंजन - उद्बोधन करणारी अभिनेत्री, ममता समतावादी कर्तव्यकठोर न्यायमूर्ती, उत्तम प्रशासक, शिक्षिका, प्राध्यापिका, प्राचार्या, कुलगुरू यासारख्या स्फुलिंगानी जीवन उजाळणारी स्त्री ही सौदामिनी आहे.

ग्रामपंचायतपासून ते संसदेपर्यंत स्त्रियांचा मुक्तपणे वावर आहे. त्या ज्या ज्या पदावर आरूढ झाल्या त्या त्या पदाला त्यांनी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. स्वतःच्या कार्यकर्तृत्वाने एक आदर्श निर्माण केला. असे असले तरीही तिच्या यातना संपत नाहीत. डॉ.तारा भवाळकर म्हणतात, चस्त्रीजीवन हे पुरूषाच्या तुलनेने जगाच्या पाठीवर सर्वत्रच उपेक्षित जीवन आहे. भारतीय स्त्रीची वेदना तर असीम, अनंत वेदना आहेछ५ या वेदना वाहून त्या वाटचाल करीत आहेत. आपला उज्ज्वल वारसा चालवित आहेत. सासर आणि माहेर दोन्हीही घरांना उजाळीत आहेत. भारतीय स्त्रियांचा हा पराक्रम जगातील स्त्रियांनी आदर्श घ्यावा असा आहे. दोन्हीही घरांना यशस्वीपणे सांभाळणे हा कुटुंब संस्थेतील चमत्कारच नव्हे काय ? भारतीय स्त्रियांशिवाय इतरांना तो पेलला का ?

भारत भूमीवरील स्त्रिया स्वतःच्या वाटा स्वतः निर्माण करणाऱ्या आहेत. स्वतःच्या कल्पकतेवर व हिंमतीवर त्या सामर्थ्यसंपन्न बनणाऱ्या आहेत. परिस्थिती समोर वाकण्याऐवजी त्या परिस्थितीला वाकविणाऱ्या आहेत. ही अलौकिक प्रज्ञा त्यांना परमेश्वराने प्रदान केली आहे. उदाहरणच द्यायचे झाले : तर भारतात हजारो शेतकऱ्यांनी परिस्थितीसमोर हतबल होऊन आत्महत्या केल्या; त्यांच्या मागे राहिलेल्या त्यांच्या स्त्रियांनी पतीचे अनुकरण न करता समर्थपणे संसार सांभाळला. हा इतिहास आहे. याचाच अर्थ असा - भारतीय स्त्री ही समाजात व्यवस्था प्रस्थापित करणारी आहे. व्यवस्थेला व्यवस्थित वळण लावणारी आहे. इष्टाला स्वीकारणारी आणि अनिष्टाला नाकारणारी आहे. म्हणूनच तिचे कार्य चिरस्थायी आहे. समाजातील तिचे स्थान अढळ आहे.तिने चारित्र्य, शील, सहृदयता बुलंद केली आहे. त्यामुळे समाज निर्भय, स्वस्थ आणि शांत आहे. तिच्यामुळेच विधायकता आणि विरागिता येथे विसावली आहे.

भारतीय स्त्री ही नेहमीच सदाचारी आणि सद्वर्तनी वागत आली आहे. त्यामुळेच ती सरळ स्वभावाची आहे. भारताला मिळालेला तो उत्तम वारसा आहे. तिच्यात आढळणारा बौध्दिक हव्यास, ध्येयासक्तता, दीर्घोद्योग, हाल सोसण्याची तयारी, कृतीप्रवण धडपड, त्यागाचा सराव, निर्लोभता, साधेपणा व समत्व हे सर्वगुणसंपन्न असल्यामुळे ती सर्वांच्या मनात कायम घर करून राहिली आहे. तिने समाजाला संयम शिकविला. त्यामुळे भौतिक प्रगतीने भारतीय समाज भांबावत नाही. त्याला एकाकीपण ग्रासत नाही. कुटुंबवत्सलता व भावनिक नातेसंबंधाची नाळ तो तोडत नाही. जीवनाला सात्विक बनविण्याचा तो सतत प्रयत्न करतो. चंगळवाद नाकारून आत्मसुखास आणि समाजसुखास प्राधान्य देतो. त्यासाठी सहकार्य - सहयोग स्वीकारतो. मानवतावादाला प्राधान्य देता, म्हणूनच येथे रामराज्य येते. लोकशाही नांदते.

अशा या स्त्रियांचे उपकार व गुण आठविणे हे प्रत्येक भारतीयचे आद्य कर्तव्य आहे. कारण गंगा - यमुनेचा शीतलपण खंबीर प्रवाहीपणा, मलयानरील चंदनी सुगंध, हिमालय - सह्याद्रीचा अचलपणा - निश्चलपणा, वसंतातील रती लावण्यता ; पण यापेक्षाही दुधातील बलशाही मातृत्वाचा संजीवणपणा ; या सर्वांची सचेतन मूर्ती म्हणजे भारतीय स्त्री ! देशाची अस्मिता, पवित्रता आणि मंगलता म्हणजे भारतीय स्त्री !! रती, प्रीती आणि भक्ती यांचे त्रिअमृत म्हणजे भारतीय स्त्री !!!

**संदर्भ :**


१. स्वामी, डॉ.श्रीमती एस.के. : दै.तरूण भारत, सोलापूर, मंगळवार, दि.०८ मार्च २०११, पृष्ठ क्रमांक ०४.

२. रानडे, प्रतिभा : स्त्री प्रश्नांची चर्चा - एकोणिसावे शतक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००५, पृ.क्र. ३१५

३. धोंगडे, डॉ. अश्विनी : स्त्रीवादी समीक्षा - स्वरूप आणि उपयोजन, दिलीपराज प्रकाशन. पुणे, तृतीयावृत्ती २००९, पृ.क्र. ०९

४. संत, डॉ.दु.का. : मराठी स्त्री, पद्मगंधा प्रकाशन. पुणे, व्दितीयावृत्ती २००३, पृ.क्र. १९-२०

५. भवाळकर, डॉ. तारा : लोकपरंपरा आणि स्त्री प्रतिभा, लोकवाङ्मय गृह. मुंबई. तृतीयावृत्ती. ००८, पृ.क्र. २-३.